## MAHARASHTRA ACT No. XXXVI OF 1984

### THE SHIVRAJ FINE ART LITHO WORKS (ACQUISITION AND TRANSFER OF UNDERTAKING) ACT, 1984.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २१ डिसेंबर, १९८४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विविध व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXVI OF 1984

AN ACT TO PROVIDE FOR THE ACQUISITION AND TRANSFER OF THE UNDERTAKING OF THE SHIVRAJ FINE ART LITHO WORKS, NAGPUR, WITH A VIEW TO SECURING THE PROPER MANAGEMENT OF SUCH UNDERTAKING SO AS TO SUBSERVE THE INTERESTS OF THE GENERAL PUBLIC AND THE EMPLOYEES OF THE UNDERTAKING BY ENSURING THE CONTINUED MANUFACTURE, PRODUCTION AND DISTRIBUTION OF PRINTED LITHOGRAPHIC MATERIAL WHICH ARE ESSENTIAL TO THE NEEDS OF THE ECONOMY OF THE STATE AND COUNTRY AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २१ सप्टेंबर १९८४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६.

**शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स, नागपूर या उपक्रमाच्या संबंधात, राज्याच्या व देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या छापील शिलामुद्रण साहित्याची निर्मिती, उत्पादन व वितरण अखंडपणे चालू राहण्याची निश्चिती करून, सर्वसाधारण जनतेचे व उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांचे हित साध्य होईल अशा रीतीने उपक्रमाचे योग्य ते व्यवस्थापन व्हावे या दृष्टीने या उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण करण्यासाठी आणि तत्संबंधीच्या व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स, नागपूर म्हणून संबोधण्यात येणारे मुद्रणालय हे
१९३२ 'भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२' अन्वये महाराष्ट्र राज्यात नोंदणी केलेल्या भागीदारी संस्थेचे
चा ९. भागीदार म्हणून एका कुटुंबातील व्यक्तीकडून चालवले जात होते ;

यापुढील मजकूर पृष्ठ ४५८ वर पहावा.

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास 'शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स (उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८४' असे म्हणता येईल.

(२) तो ११ ऑगस्ट १९८४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(अ) "नियत दिवस" म्हणजे, ज्या दिवशी हा अधिनियम अंमलात येईल तो दिवस;

(ब) "आयुक्त" म्हणजे, कलम १४ अन्वये नेमलेला अधिदान आयुक्त;

(क) "महामंडळ" म्हणजे, "कंपनी अधिनियम, १९५६" अन्वये शासकीय कंपनी म्हणून नोंदलेले विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर; १९५६ चा १.

(ड) "नवीन शासकीय कंपनी" म्हणजे, कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये हा उपक्रम जिच्याकडे निहित करण्याचे निदेश देण्यात आले आहेत अशी, "कंपनी अधिनियम, १९५६" अन्वये स्थापन केलेली व नोंदणी केलेली (दुय्यम शासकीय कंपनीसह) शासकीय कंपनी; १९५६ चा १.

(ई) "विहित" म्हणजे, या अधिनियमाअन्वये केलेल्या नियमांद्वारे विहित;

(फ) "मालक" म्हणजे, "भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२" खाली नोंदणी केलेली व सुभाष रोड, नागपूर येथे मुख्यालय असलेली, "शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स," नागपूर या नावाने ओळखली जाणारी व दिनांक ९ जानेवारी १९७४ रोजी विसर्जित होण्याच्या लगतपूर्वी जशी अस्तित्वात होती त्या स्वरूपातील भागीदारी संस्था, आणि त्यात, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नागपूर यांच्या न्यायालयातील १९७४ चा दिवाणी दावा क्र. ९ मध्ये नेमलेल्या प्रापकाचा किंवा प्रापकांचा समावेश होतो; १९३२ चा ९.

(ग) "अनुसूची" म्हणजे, या अधिनियमास जोडलेली अनुसूची;

(ह) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाच्या संबंधात "विनिर्दिष्ट तारीख" म्हणजे, राज्य शासन, त्या उपबंधाच्या प्रयोजनार्थ, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्या उपबंधाच्या प्रयोजनांसाठी विनिर्दिष्ट करील अशी तारीख, आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या उपबंधांसाठी वेगवेगळ्या तारखा विनिर्दिष्ट करता येतील;

(आय) "उपक्रम" म्हणजे, मालकाच्या मालकीचा "शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स, नागपूर" या नावाचा औद्योगिक उपक्रम.

## प्रकरण दोन

### उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण

उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण आणि तो राज्य शासनाकडे निहित होणे व महामंडळाकडे हस्तांतरित व निहित होणे. ३. (१) नियत दिवशी, हा उपक्रम आणि मालकांचे त्यांच्या उपक्रमासंबंधातील हक्क, स्वत्वाधिकार आणि हितसंबंध हे, या अधिनियमाच्या प्रभावाने, राज्य शासनाकडे हस्तांतरित होऊन पूर्णपणे निहित होतील.

(२) पोट-कलम (१) च्या प्रभावाने, राज्य शासनाकडे निहित झालेला उपक्रम, अशा रीतीने तो निहित झाल्यानंतर ताबडतोब महामंडळाकडे हस्तांतरित व निहित होईल.

४. (१) नियत दिवसाच्या लगतपूर्वी, मालकाच्या मालकीची, त्याच्या ताब्यात, अधिकारात किंवा नियंत्रणाखाली असणारी भारतातील किंवा भारताबाहेरील सर्व मत्ता, हक्क, पट्टेदारी, अधिकार, प्राधिकार व विशेषाधिकार आणि जमिनी, इमारती, कर्मशाळा, भांडारे, उपकरणे, यंत्रसामुग्री व साधनसामग्री, रोख शिलकी रकमा, हातातील रोकड, राखीव निधी, गुंतवणूक, पुस्तकी ऋण धरून, सर्व जंगम व स्थावर मालमत्ता आणि अशा मालमत्तेवरील किंवा त्यातून निर्माण होणारे इतर सर्व हक्क व हितसंबंध आणि त्याच्या संबंधित कोणत्याही स्वरूपाची लेखापुस्तके, नोंदवह्या व इतर सर्व दस्तऐवज यांचा या उपक्रमामध्ये समावेश होतो, असे समजण्यात येईल. निहिती-करणाचा सर्वसाधारण परिणाम.

(२) कलम ३ अन्वये राज्य शासनाकडे निहित झालेली उपरोक्त सर्व मालमत्ता ही अशा निहिती-करणामुळे, तिच्यावर परिणाम करणारी कोणतीही विश्वस्तव्यवस्था, आबंधन, गहाणवटीचे व्यवहार, प्रभार, धारणाधिकार व इतर सर्व भार यांपासून मुक्त व निर्वेध होईल आणि अशा मालमत्तेचा वापर कोणत्याही प्रकारे निर्बंधित करणारा किंवा अशा संपूर्ण मालमत्तेच्या किंवा तिच्या काही भागाच्या संबंधात एखादा प्रापक नेमणारा कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा किंवा अन्य प्राधि-करणाचा कोणताही जप्ती, आदेश, व्यादेश हुकूमनामा किंवा आदेश मागे घेण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(३) या अध्यादेशान्वये राज्य शासनाकडे निहित झालेल्या मालमत्तेचा प्रत्येक गहाणधारक आणि अशा मालमत्तेवर किंवा तिच्या संबंधात कोणताही प्रभार, धारणाधिकार किंवा अन्य हितसंबंध असणारी प्रत्येक व्यक्ती, विहित करण्यात येईल अशा कालमर्यादेत आणि अशारीतीने, अशा गहाण-वटीची, प्रभाराची, धारणाधिकाराची किंवा अन्य हितसंबंधाची माहिती आयुक्तांना कळवील.

(४) शंकानिवारणार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, पोट कलम (३) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या गहाणधारकाला किंवा अशा कोणत्याही मालमत्तेचा किंवा मालमत्तेच्या संबंधातील प्रभार, धारणाधिकार किंवा अन्य हितसंबंध धारण करणाऱ्या कोणत्याही अन्य व्यक्तीला त्याच्या हक्कांनुसार व हितसंबंधांनुसार, कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेतून आणि कलम ८ मध्ये उल्लेखलेल्या रकमेतूनही, गहाणाधन किंवा इतर येणे रकमा चुकत्या केल्या जाण्याची मागणी करण्याचा हक्क असेल, परंतु असे गहाण, प्रभार, धारणाधिकार किंवा अन्य हितसंबंध हे राज्य शासनाकडे व महामंडळाकडे निहित झालेल्या कोणत्याही अशा मालमत्तेविरुद्ध बजावणी-योग्य नसतील.

(५) कलम ३ अन्वये राज्य शासनाकडे निहित झालेल्या उपक्रमाच्या संबंधात, नियत दिवसा-पूर्वी कोणत्याही वेळी मालकांना दिलेले आणि त्या दिवसाच्या निकटपूर्वी अंमलात असलेले कोणतेही लायसन्स किंवा अन्य संलेख हा, अशा उपक्रमाच्या संबंधात आणि अशा उपक्रमाच्या प्रयोजनार्थ, त्या लायसन्सच्या वा विलेखाच्या मथितार्थानुसार नियत दिवशी व त्यानंतर अंमलात असण्याचे चालू राहील आणि असा उपक्रम कलम ३ अन्वये महामंडळाकडे किंवा कलम ६ अन्वये नवीन शासकीय कंपनीकडे निहित झाल्यानंतर जणू काही महामंडळ किंवा, प्रकरणपरत्वे, नवीन शासकीय कंपनी यांनाच ते लायसन्स किंवा अन्य संलेख दिला असल्याप्रमाणे महामंडळाचे किंवा नवीन शासकीय कंपनीचे नाव अशा लायसन्समध्ये किंवा अन्य संलेखामध्ये मूळ नावाऐवजी दाखल केले असल्याचे मानण्यात येईल आणि मालकांनी त्यासंबंधीचा अटींच्या अनुसार ते जेवढ्या उर्वरित कालावधीसाठी धारण केले असते तेवढ्या उर्वरित कालावधीसाठी महामंडळ किंवा नवीन शासकीय कंपनी ते धारण करील.

(६) नियत दिवशी, जर, कलम ३ अन्वये महामंडळाकडे निहित झालेल्या कोणत्याही माल-मत्तेबाबत मालकांतर्फे किंवा मालकांविरुद्ध दाखल केलेला किंवा सुरू केलेला कोणताही दावा, अपील किंवा कोणत्याही स्वरूपाची इतर कार्यवाही अनिर्णीत असेल तर, उपक्रम हस्तांतरित झाल्याच्या किंवा या अधिनियमात समाविष्ट अशा कोणत्याही गोष्टीच्या कारणावरून, ती अवसित होणार नाही, खंडित होणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे तीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही, तर तो दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही महामंडळाला, किंवा प्रकरणपरत्वे, नवीन शासकीय कंपनीला किंवा त्यांच्याविरुद्ध चालू ठेवता येईल, करता येईल किंवा बजावता येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ "कोणताही दावा, अपील किंवा कोणत्याही स्वरूपाची इतर कार्यवाही" या शब्दप्रयोगात, दिवाणी न्यायाधीश, उच्च स्तर, नागपूर यांच्या न्यायालयात अनिर्णीत असलेला १९७४ चा दिवाणी दावा क्र. ९ याचा समावेश होणार नाही.

**पूर्वीच्या दायित्वांबद्दल मालक उत्तरदायी असणे.**

५. (१) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालकांच्या दायित्वांव्यतिरिक्त नियत दिवसापूर्वीच्या कोणत्याही कालावधीबाबतचे प्रत्येक दायित्व हे मालकांचे दायित्व असेल आणि त्यासंबधीचा हक्क त्यांच्याचविरुद्ध बजावता येईल. राज्य शासन किंवा महामंडळ यांच्या किंवा जेथे एखादा उपक्रम कलम ६ अन्वये नवीन शासकीय कंपनीकडे निहित करण्यात आला असेल तेथे त्या नवीन शासकीय कंपनीच्या विरुद्ध तो दायित्व हक्क बजावता येणार नाही.

(२) उपक्रमाचे व्यवस्थापन केंद्र सरकारने स्वत:कडे घेतल्यानंतर महामंडळाने केलेल्या व्यवहारातून निर्माण झालेली, उपक्रमाला पुरवण्यात आलेल्या मालासंबंधीची किंवा उपक्रमाला दिलेल्या कर्जासंबंधीची किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची कोणतीही दायित्वे, नियत दिवशी व त्या दिवसापासून महामंडळाची दायित्वे ठरतील आणि त्यांची नियत दिवशी पूर्तता झालेली नसेल तर महामंडळाकडून त्यांची पूर्तता केली जाईल.

(३) शंकानिवारणार्थ याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की,—

(क) या कलमात किंवा या अधिनियमाच्या अन्य उपबंधांत अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीजकरून एरव्ही, पोट कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालकांच्या दायित्वाव्यतिरिक्त, नियत दिवसापूर्वीच्या कोणत्याही कालावधीबाबतचे कोणतेही दायित्व हे, राज्य शासनाच्या किंवा महामंडळाच्या किंवा जेथे तो उपक्रम कलम ६ अन्वये अन्य एखाद्या नवीन शासकीय कंपनीकडे निहित केला असेल तेथे, त्या नवीन शासकीय कंपनीच्या विरुद्ध बजावता येणार नाही;

(ख) पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधातील कज्जा, दावा किंवा विवाद सोडून अन्य असा कोणताही कज्जा, दावा किंवा विवाद त्या उपक्रमाबाबत नियत दिवसापूर्वी उद्‌भवला असून त्यासंबंधी कोणत्याही न्यायालयाने, न्यायाधिकारणाने किंवा अन्य प्राधिकरणाने त्या दिवशी किंवा त्यानंतर जो कोणताही निवाडा, हुकूमनामा किंवा आदेश संमत केला असेल तो राज्य शासनाच्या किंवा महामंडळाच्या विरुद्ध अथवा कलम ६ अन्वये तो उपक्रम अन्य कोणत्याही नवीन शासकीय कंपनीकडे निहित होण्याचे निदेशित केले असल्यास, अशा नवीन शासकीय कंपनीच्या विरुद्ध बजावता येणार नाही.

(ग) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करून, नियत दिवसापूर्वी मालकांनी ओढवून घेतलेले कोणतेही दायित्व, राज्य शासन अथवा महामंडळ यांच्या अथवा कलम ६ अन्वये उपक्रम अन्य एखाद्या नवीन शासकीय कंपनीत निहित करण्याचे निदेशित केले असेल त्या बाबतीत अशी नवीन शासकीय कंपनी यांच्याविरुद्ध बजावता येणार नाही;

(घ) या अधिनियमाच्या कलम १२ चे पोट-कलम (१) अथवा त्याचे अन्य कोणतेही उपबंध अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेला अन्य कोणताही कायदा अथवा कोणतीही संविदा, करारनामा, समझोता अथवा कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा अन्य प्राधिकरण यांचा निवाडा किंवा हुकूमनामा किंवा आदेश यांत काहीही अंतर्भूत असले तरी, 'उद्योग (विकास व विनियमन) अधिनियम, १९५१' यातील उपबंधान्वये केंद्र सरकारने व्यवस्थापनाच्या प्रयोजनासाठी उपक्रम ताब्यात घेण्याच्या तारखेच्या पूर्वीचा काही काळ कोणत्याही कर्मचाऱ्याने उपक्रमात केलेल्या नोकरी-संबंधात मालकांविरुद्ध केलेल्या कोणत्याही स्वरूपाच्या मागण्यांबाबतचे दायित्व, राज्य शासन अथवा महामंडळ यांविरुद्ध बजावता येणार नाही.

**उपक्रम नवीन शासकीय कंपनीत निहित करण्याचा निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.**

६. (१) कलमे ३ आणि ४ यांत काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३ च्या पोट कलम (२) अन्वये उपक्रम महामंडळाकडे निहित झाला असेल त्या बाबतीत, राज्य शासन, त्यास लादणे योग्य वाटतील अशा अटी व शर्ती यांच्या अधीनतेने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, जो उपक्रम व ज्याच्या संबंधातील मालकांचा हक्क, स्वत्वाधिकार व हितसंबंध राज्य शासनाकडे निहित करण्यात आले होते व हस्तांतरणानंतर ते कलम ३ अन्वये महामंडळाकडे निहित झालेले आहेत. तो उपक्रम व तो हक्क स्वत्वाधिकार व हितसंबंध, महामंडळाकडे निहित असण्याचे चालू राहण्याऐवजी अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखेपासून नवीन शासकीय कंपनीत निहित होतील.

४६० (आ)

(२) मालकांचा उपक्रमासंबंधातील हक्क स्वत्वाधिकार, व हितसंबंध पोट कलम (१) अन्वये नवीन शासकीय कंपनीत निहित होतील तेव्हा, अशी शासकीय कंपनी, असे निहितीकरण झाल्याच्या

आ पुढील मजकूर पृष्ठ ४५८ वर पहावा.

**आणि ज्याअर्थी,** ऐच्छिक भागीदारी असलेल्या या भागीदारी संस्थेचे विसर्जन करण्यासंबंधात त्या कुटुंबातील व्यक्तींमध्ये तंटा निर्माण झाल्यामुळे, भागीदारांमध्ये न्यायालयीन वाद सुरू झाला होता आणि दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नागपूर यांच्या न्यायालयात १९७४ चा दिवाणी दावा क्र. ९, हा दाखल करण्यात आला होता व त्यामध्ये, शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्सच्या व्यवस्थापनाकरिता वेळोवेळी धारकांची नेमणूक करण्यात आली होती आणि तो दावा त्या न्यायालयात प्रलंबित आहे;

**आणि ज्याअर्थी,** शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स हे मुद्रणालय, उद्योग (विकास व नियमन)
१९५१ अधिनियम, १९५१ च्या पहिल्या अनुसूचीत नमूद केलेल्या मुद्रित, कोरीव (एनग्रेव्हड) शिलामुद्रण
चा साहित्याची निर्मिती, उत्पादन व वितरणाचे काम करीत होते;
६५.

**आणि ज्याअर्थी,** शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स नावाचा हा उपक्रम १७ मे १९७९ पासून बंद करण्यात आला होता व ह्यामुळे सुमारे ४६० कर्मचाऱ्यांचा रोजगार बंद झाला होता;

**आणि ज्याअर्थी,** भारत सरकार, उद्योग मंत्रालय (औद्योगिक विकास विभाग) आदेश, क्रमांक एसओ. ६३४(ई)/१८एए/आयडीआरए/८०, दिनांक २३ ऑगस्ट १९८० अन्वये, केंद्र सरकारने,
१९५१ उद्योग (विकास व नियमन) अधिनियम, १९५१ च्या उपबंधांनुसार सदर उपक्रमाचे व्यवस्थापन
चा स्वतःकडे घेतले होते, आणि विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांची त्या उपक्रमाचे
६५. प्राधिकृत व्यवस्थापक म्हणून नेमणूक करण्यात आली होती;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्तप्रमाणे भारत सरकारने त्या उपक्रमाचा ताबा घेण्याच्या आदेशास हरकत घेणारा १९८० चा विनंती (रिट) अर्ज क्र. २७४१, काही भागीदारांनी दाखल केला होता, त्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर न्यायपीठाने २८ एप्रिल १९८२ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाद्वारे उक्त आदेश रद्बातल केला होता;

**आणि ज्याअर्थी,** विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते आणि सर्वोच्च न्यायालयाने आपल्या २६ मे १९८२ च्या आदेशान्वये उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी स्थगित केली होती;

**आणि ज्याअर्थी,** उपक्रमाच्या अशा व्यवस्थापनाचा कालावधी वेळोवेळी वाढवण्यात आला होता आणि तो २२ ऑगस्ट १९८४ रोजी समाप्त होणार होता;

**आणि ज्याअर्थी,** उपक्रमाकडून मुद्रित, कोरीव शिलामुद्रण साहित्याची निर्मिती, उत्पादन व वितरण करण्यासाठी उपलब्ध सुविधांचा पुरेपूर वापर व्हावा या प्रयोजनार्थ, उपक्रमाचे व्यवस्थापन सतत योग्य प्रकारे होणे व मोठे भांडवल त्या उपक्रमात गुंतवणे आवश्यक होते;

**आणि ज्याअर्थी,** राज्याच्या व देशाच्या अर्थव्यवस्थेच्या गरजांच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या उपरोक्त वस्तूंची उपक्रमाकडून सातत्याने निर्मिती, उत्पादन व वितरण करून जनतेच्या व उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांच्या हितसंबंधाचे जतन होईल याची खातरजमा करून घेण्यासाठी उक्त उपक्रमाचे संपादन करणे आणि तत्संबंधीच्या किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट होते;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३९, खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तत्त्वाचे पालन करण्याबाबतचे राज्याचे धोरण अंमलात आणण्यासाठी असे संपादन करावयाचे होते;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्याकरिता त्वरित कार्यवाही करणे जिमुळे आवश्यक ठरते अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली
१९८४ होती; व म्हणून त्यांनी ११ ऑगस्ट १९८४ रोजी शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स (उपक्रमाचे
चा संपादन व हस्तांतरण) अध्यादेश, १९८४ प्रख्यापित केला होता;
महा.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट
अध्या. आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पस्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात
५. येत आहे :—

तारखेस व त्यानंतर अशा उपक्रमाच्या संबंधात मालक झाली असल्याचे मानण्यात येईल आणि अशा निहितीकरणानंतर उपक्रमाच्या संबंधातील राज्य शासनाचे व महामंडळाचे सर्व हक्क व दायित्वे ही, त्या तारखेस व त्यानंतर अशा शासकीय कंपनीचे हक्क व दायित्वे झाली असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण तीन

### रक्कमा देणे

रक्कम देणे. ७. कलम ३ अन्वये, तो उपक्रम व मालकांचा त्या उपक्रमाच्या संबंधातील, हक्क, स्वत्वाधिकार व हितसंबंध, राज्य शासनाकडे हस्तांतरित व निहित करण्याबद्दल राज्य शासन मालकांना चौदा लाख बारा हजार रुपये इतकी रक्कम रोखीने आणि प्रकरण सहामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने देईल.

पुढील रकमा देणे. ८. (१) "उद्योग (विकास व नियमन) अधिनियम, १९५१" च्या उपबंधांनुसार केंद्र सरकारने केलेल्या आदेशांना अनुसरून ज्या तारखेला उपक्रम ताब्यात घेण्यात आला होता त्या तारखेला म्हणजे २३ ऑगस्ट १९८० रोजी सुरू होणाऱ्या व नियत दिवशी संपणाऱ्या कालावधीत उपक्रमाच्या (जो १७ मे १९७९ पासून २२ ऑगस्ट १९८० पर्यंत बंद राहिला होता) व्यवस्थापनापासून मालकांना वंचित केल्याबद्दल मालकांना वार्षिक पाच हजार रुपये इतकी रक्कम रोखीने आणि प्रकरण सहामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने देण्यात येईल.

(२) नियत दिवशी सुरू होणाऱ्या व कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली रक्कम राज्य शासन ही रक्कम आयुक्तांच्या स्वाधीन करील त्या तारखेला संपणाऱ्या कालावधीकरिता अशा रकमेवर द. सा. द. शे. ४ दराने सरळ व्याज लागू होईल.

(३) कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेखेरीज, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली रक्कम आणि पोटकलम (२) च्या उपबंधांनुसार निर्धारित करण्यात आलेली रक्कम राज्य शासन मालकांना देईल.

(४) शंकानिरसनासाठी याद्वारे घोषित करण्यात येते की, कलम ३ अन्वये राज्य शासनाकडे निहित झालेल्या उपक्रमाच्या संबंधातील मालकांची दायित्वे ही, मालकांच्या धनकोंचे हक्क व हितसंबंध यांच्या अनुसार, कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमांमधून आणि तसेच पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम व पोटकलम (२) खाली निर्धारित केलेली रक्कम यांमधूनदेखील चुकती करण्यात येतील.

## प्रकरण चार

### उपक्रमाचे व्यवस्थापन, इत्यादी

उपक्रमाचे व्यवस्थापन, इत्यादी. ९. कलम ३, पोटकलम (१) अन्वये ज्याच्या संबंधातील हक्क स्वत्वाधिकार व हितसंबंध हे राज्य शासनाकडे निहित करण्यात आलेले आहेत त्या उपक्रमाचा कारभार व धंदा यांवर सर्वसाधारण अधीक्षण, निदेशन, नियंत्रण व व्यवस्थापन करण्याचा अधिकार--

(अ) कलम ३ च्या पोटकलम (२) मधील उपबंधांच्या आधारे महामंडळाकडे निहित होईल ; किंवा

(ब) कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाकडून निदेश देण्यात आला असेल त्या बाबतीत, नवीन शासकीय कंपनीकडे निहित होईल

आणि त्यानंतर, मालकांना आपल्या उपक्रमाच्या संबंधात ज्या ज्या अधिकारांचा वापर करण्याचा व ज्या ज्या गोष्टी करण्याचा प्राधिकार करण्यात होता त्या सर्व अधिकारांचा वापर करण्याचा व त्या सर्व गोष्टी करण्याचा हक्क फक्त महामंडळाला अथवा प्रकरणपरत्वे अशा शासकीय कंपनीला असेल. इतर कोणाही व्यक्तींना असा हक्क असणार नाही.

१०. (१) उपक्रमाचे व्यवस्थापन महामंडळाकडे किंवा नवीन शासकीय कंपनीकडे निहित झाल्यानंतर, असे निहितीकरण होण्याच्या निकटपूर्वी उपक्रमाच्या व्यवस्थापनाचा प्रभार असणाऱ्या व्यक्तींनी उपक्रमाच्या संबंधात त्यांच्या ताब्यातील सर्व मत्ता, लेखापुस्तके, नोंदवह्या आणि इतर कागदपत्रे महामंडळाच्या किंवा, प्रकरणपरत्वे, नवीन शासकीय कंपनीच्या स्वाधीन करणे हे बंधनकारक असेल. सर्व मत्ता इत्यादी सुपूर्द करणे हे उपक्रमाच्या व्यवस्थापनाचा प्रभार असणाऱ्या व्यक्तींचे कर्तव्य.

(२) राज्य शासन प्रकरणाच्या परिस्थितीनुसार इष्ट वाटतील असे निदेश महामंडळाला किंवा नवीन शासकीय कंपनीला देऊ शकेल आणि महामंडळाला किंवा अशा शासकीय कंपनीला तसे करणे आवश्यक वाटले तर, उपक्रमाचे व्यवस्थापन कशा रीतीने करण्यात यावे याबाबत किंवा असे व्यवस्थापन करीत असताना उद्भवणाऱ्या अन्य कोणत्याही बाबींसंबंधात सूचना मिळाव्यात यासाठी कोणत्याही वेळी राज्य शासनाकडे अर्जही करता येईल.

११. (१) या अधिनियमान्वये राज्य शासनाकडे अथवा महामंडळाकडे किंवा नवीन शासकीय कंपनीकडे निहित करण्यात आलेल्या उपक्रमाच्या संबंधातील कोणत्याही मत्ता, पुस्तके, दस्तऐवज अथवा इतर कागदपत्रे नियत दिवशी जिच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असतील अशी कोणतीही व्यक्ती उक्त मत्ता, पुस्तके, दस्तऐवज किंवा इतर कागदपत्रे यांचा हिशेब राज्य शासनास, महामंडळास अथवा, प्रकरणपरत्वे, नवीन शासकीय कंपनीस देण्यास जबाबदार असेल. आणि ती राज्य शासनाच्या अथवा महामंडळाच्या किंवा अशा शासकीय कंपनीच्या अथवा याबाबतीत राज्य शासन, महामंडळ किंवा अशी शासकीय कंपनी बिनिर्दिष्ट करील अशा व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या सुपूर्द करील. आपल्या कब्जात असलेली मत्ता इत्यादींचा हिशेब देणे हे व्यक्तींचे कर्तव्य.

(२) राज्य शासनाला किंवा महामंडळाला किंवा उपरोक्त शासकीय कंपनीला या अधिनियमान्वये राज्य शासनाकडे अथवा महामंडळाकडे अथवा अशा शासकीय कंपनीकडे निहित करण्यात आलेल्या उपक्रमाचा ताबा घेण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करता येतील किंवा त्याबाबत व्यवस्था करता येईल.

(३) कलम ३ च्या पोटकलम (१) अन्वये राज्य शासनाकडे आणि त्या कलमाच्या पोटकलम (२) च्या आधारे महामंडळाकडे जो उपक्रम निहित करण्यात आलेला आहे त्याच्याशी संबंधित अशी नियत दिवशी असलेली त्याची सर्व मालमत्ता व मत्ता यांची संपूर्ण जंत्री याबाबतीत राज्य शासन देईल तेवढ्या मुदतीत मालक शासनाला सादर करतील, आणि या प्रयोजनास्तव राज्य शासन अथवा महामंडळ मालकांना योग्य त्या सर्व सुविधा देईल.

## प्रकरण पाच

### मालकांच्या कर्मचाऱ्यांशी संबंधित असलेल्या तरतुदी

१२. (१) नियत दिवसाच्या लगतपूर्वी उपक्रमात नोकरीला असलेली प्रत्येक व्यक्ती,— कर्मचाऱ्यांच्या सेवा चालू राहाणे.

(अ) नियत दिवशी व तेव्हापासून महामंडळाची कर्मचारी होईल; आणि

(ब) कलम ६, पोटकलम (१) अन्वये उपक्रम नवीन शासकीय कंपनीकडे निहित करण्याचा निदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत, अशा निहितीकरणाच्या तारखेस व तेव्हापासून अशा शासकीय कंपनीची कर्मचारी होईल,

आणि असे निहितीकरण झाले नसते तर तिला निवृत्तिवेतन, उपदान व इतर गोष्टींच्या बाबतीत जे हक्क व विशेषहक्क मिळाले असते तेच हक्क व विशेषहक्क यांसह महामंडळातील अथवा, प्रकरणपरत्वे, अशा शासकीय कंपनीतील पद धारण करील अथवा सेवा करील आणि महामंडळातील किंवा, प्रकरणपरत्वे, अशा शासकीय कंपनीतील तिची नोकरी रीतसर समाप्त करण्यात आली नाही तर आणि तोपर्यंत, किंवा तिचे पारिश्रमिक व इतर सेवाशर्ती महामंडळाकडून किंवा, प्रकरणपरत्वे, अशा शासकीय कंपनीकडून रीतसर बदलण्यात आल्या नाहीत तर व तोपर्यंत ती स्थिती चालू राहील.

(२) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ यात अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, उपक्रमात नोकरीला असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा इतर व्यक्तीच्या सेवा महामंडळाकडे किंवा अशा शासकीय कंपनीकडे बदली करण्यात आल्या तर या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये असा अधिकारी किंवा अन्य कर्मचारी कोणतीही नुकसानभरपाई मिळण्यास पात्र असणार नाही आणि अशा प्रकारचा दावा कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा अन्य प्राधिकरण विचारात घेणार नाही. १९४७ चा १४.

**भविष्य-निर्वाह निधी व इतर निधी.** १३. (१) जेव्हा उपक्रमात नोकरीला असलेल्या व्यक्तींच्या लाभासाठी मालकांनी भविष्यनिर्वाह निधी, वयोनिवृत्ती निधी, कल्याण निधी अथवा अन्य कोणताही निधी स्थापन केला असेल त्याबाबतीत, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली महामंडळाकडे किंवा, प्रकरणपरत्वे, नवीन शासकीय कंपनीकडे ज्यांच्या सेवा बदली करण्यात आल्या असतील त्या अधिकाऱ्यांशी किंवा कर्मचाऱ्यांशी संबंधित असलेल्या रकमा नियत दिवशी अशा भविष्यनिर्वाह निधीच्या, वयोनिवृत्ती निधीच्या, कल्याण निधीच्या किंवा इतर निधीच्या खाती जमा असलेल्या रकमेतून महामंडळाकडे किंवा अशा शासकीय कंपनीकडे हस्तांतरित व निहित होतील.

(२) पोट कलम (१) अन्वये महामंडळाकडे किंवा प्रकरणपरत्वे, अशा शासकीय कंपनीकडे हस्तांतरित झालेल्या पैशांचा व्यवहार विहित करण्यात येईल अशा रीतीने महामंडळ किंवा अशी शासकीय कंपनी करील.

## प्रकरण सहा

### अधिदान आयुक्त

**अधिदान आयुक्ताची नियुक्ती.** १४. (१) राज्य शासन, कलमे ७ व ८ अन्वये मालकांना प्रदेय असलेल्या रक्कमा त्यांना वितरित करण्याच्या प्रयोजनासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिदान आयुक्ताची-नियुक्ती करील.

(२) आयुक्ताला सहाय्य करण्यासाठी राज्य शासनाला योग्य वाटतील अशा व्यक्तींची नियुक्ती करता येईल आणि त्यानंतर आयुक्त, या अधिनियमान्वये त्याला वापरता येतील अशा सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठीसुद्धा, अशा एका किंवा अधिक व्यक्तींना प्राधिकृत करू शकेल आणि निरनिराळ्या अधिकारांचा वापर करण्यासाठी निरनिराळ्या व्यक्तींना प्राधिकृत करता येईल.

(३) आयुक्तास वापरता येतील अशा अधिकारांपैकी कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीला, असे अधिकार तिला प्राधिकाराच्या अन्वये देण्यात आलेले नसून जणू काही या अधिनियमान्वये प्रत्यक्षात प्रदान करण्यात आलेले आहेत असे मानून त्याच रीतीने व तेवढ्याच परिणामकारक रीतीने ते वापरता येतील.

(४) या कलमान्वये नियुक्त करण्यात आलेल्या आयुक्ताचे व इतर व्यक्तींचे वेतन व भत्ते राज्याच्या एकत्रित निधीतून देण्यात येतील.

**राज्य शासनाकडून आयुक्ताला होणारे प्रदान.** १५. (१) राज्य शासन, विनिर्दिष्ट तारखेपासून तीस दिवसांच्या आत, मालकांना प्रदान करण्यासाठी आयुक्ताला पुढीलप्रमाणे रोख रकमा देईल :—

(अ) कलम ७ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमेएवढी रक्कम ; आणि

(ब) कलम ८ अन्वये मालकांना देय असलेल्या रकमेएवढी रक्कम.

(२) राज्याच्या लोकलेख्यामध्ये आयुक्ताच्या नावे राज्य शासनामार्फत एक ठेव खाते उघडण्यात येईल आणि या अधिनियमान्वये आयुक्ताला देण्यात येणारी प्रत्येक रक्कम त्याच्याकडून उक्त ठेव खात्यामध्ये जमा करण्यात येईल आणि उक्त ठेव खात्याचा व्यवहार आयुक्ताकडून करण्यात येईल.

(३) या अधिनियमान्वये आयुक्ताला ज्याच्या संबंधात प्रदान केले असेल त्या उपक्रमाच्या संबंधीचे अभिलेख आयुक्ताकडून ठेवण्यात येतील.

(४) पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या ठेव खात्यात जमा असलेल्या रकमेवर मिळणारे व्याज मालकाच्या लाभासाठी वापरण्यात येईल.

राज्य शासनाचे अथवा महामंडळाचे अथवा नवीन शासकीय कंपनीचे विवक्षित अधिकार.

१६. (१) राज्य शासन अथवा महामंडळ अथवा, प्रकरणपरत्वे, कलम ६, पोटकलम (१) अन्वये राज्य शासनाकडून निदेश देण्यात आला असेल त्या बाबतीत नवीन शासकीय कंपनी राज्य शासनाकडे किंवा महामंडळाकडे किंवा अशा शासकीय कंपनीकडे निहित करण्यात आलेल्या उपक्रमाच्या संबंधातील मालकास येणे असलेली आणि नियत दिवसाच्या नंतर वसूल केलेली अशी कोणतीही रक्कम मग ती वसुली नियत दिवसापूर्वीच्या कालावधीशी संबंधित असली तरी हरकत नाही. विनिर्दिष्ट तारखेपर्यंत स्वीकारण्यास हक्कदार असेल इतर कोणीही व्यक्ती हक्कदार असणार नाही.

(२) कलम ५ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले कोणतेही दायित्व वगळता, नियत दिवसापूर्वीच्या कोणत्याही कालावधीसंबंधातील मालकांचे कोणतेही दायित्व फेडण्यासाठी, राज्य शासनाने, महामंडळाने किंवा प्रकरणपरत्वे, अशा शासकीय कंपनीने नियत दिवसानंतर केलेल्या प्रत्येक प्रदानाबद्दल तिला/त्याला आयुक्ताकडे हक्कमागणी करता येईल; आणि राज्य शासनाकडून अथवा महामंडळाकडून अथवा अशा शासकीय कंपनीकडून ज्यासंबंधात अशा दायित्वाची फेड करण्यात आली आहे त्याबाबीला या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशा प्रत्येक मागणीला प्राथम्य मिळेल.

(३) या अधिनियमात अन्यथा उपबंधित करण्यात आले असेल ते खेरीजकरून, एरव्ही नियत दिवसापूर्वीच्या कोणत्याही व्यवहारासंबंधात असलेली मालकांची दायित्वे विनिर्दिष्ट तारखेला किंवा त्यापूर्वी त्यांनी फेडली नसतील तर ती मालकांची दायित्वे राहतील.

आयुक्ताकडे हक्कमागण्या करणे.

१७. उपक्रमाच्या संबंधात, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबीसंबंधात मालकाविरुद्ध कोणतीही हक्कमागणी असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, अशी हक्कमागणी विनिर्दिष्ट तारखेपासून तीस दिवसांच्या आत आयुक्ताकडे सादर करावी लागेल :

परंतु, तीस दिवसांच्या उक्त कालावधीत हक्कमागणी सादर करण्यास मागणीदाराला पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता याबद्दल आयुक्तांची खात्री झाली तर, तो त्यानंतरच्या आणखी तीस दिवसांच्या कालावधीत हक्कमागणी दाखल करून घेऊ शकेल, परंतु त्यानंतर मात्र नव्हे.

हक्कमागण्यांचा प्राथम्य क्रम.

१८. अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबीसंबंधात उद्‌भवणाऱ्या हक्कमागण्यांचा प्राथम्य क्रम पुढील तत्त्वांनुसार ठरवला जाईल :—

(अ) प्रवर्ग एकचा क्रम इतर सर्व प्रवर्गांच्या वर लागेल आणि प्रवर्ग दोनचा क्रम प्रवर्ग तीनच्या वर लागेल ;

(ब) प्रत्येक प्रवर्गात विनिर्दिष्ट केलेल्या हक्कमागण्यांचा दर्जा सारखाच राहील व त्यांच्या रकमांची पूर्णत: भरपाई करण्यात येईल, परंतु जर अशा मागण्या पूर्णत: भागवण्यास रक्कम अपुरी असेल तर, त्या मागणी रकमा समान प्रमाणात घट पावतील व त्यानुसार त्यांच्या रकमा चुकत्या करण्यात येतील ; आणि

(क) निकट वरच्या प्रवर्गात विनिर्दिष्ट केलेल्या सर्व दायित्वांच्या रकमा चुकत्या करण्यात आल्यानंतर जर रक्कम शिल्लक राहिली तरच खालच्या प्रवर्गात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसंबंधातील कोणतेही दायित्व पुरे करण्याचा प्रश्न उद्‌भवेल.

हक्कमागण्यांची तपासणी.

१९. (१) कलम १७ खाली केलेल्या हक्कमागण्या आल्यानंतर आयुक्त, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या प्राथम्यक्रमानुसार त्याची क्रमवारी लावील आणि अशा प्राथम्यक्रमानुसार त्या तपासील.

(२) जर हक्कमागण्यांची तपासणी केल्यानंतर आयुक्ताचे असे मत झाले की, या अधिनियमान्वये त्याला देण्यात आलेली रक्कम कोणत्याही खालच्या प्रवर्गात विनिर्दिष्ट केलेली दायित्वे भागवण्यास पुरेशी नाही, तर त्याने अशा खालच्या प्रवर्गातील हक्कमागण्यांची तपासणी करण्याची आवश्यकता असणार नाही.

हक्कमागण्या स्वीकृत करणे अथवा त्या/ती फेटाळणे.

२०. (१) अनुसूचीमध्ये घालून दिलेल्या प्राथम्यक्रमानुसार हक्कमागण्यांची तपासणी केल्यानंतर, आयुक्त, ज्या तारखेस किंवा तत्पूर्वी प्रत्येक मागणीदाराने आपल्या मागणीहक्काचा पुरावा दाखल करावयास तारीख निश्चित करील.

(२) निश्चित केलेल्या तारखेची कमीत कमी दिवसांची नोटीस, आयुक्तास योग्य वाटेल अशा इंग्रजी भाषेतील दैनिक वृत्तपत्राच्या एका अंकात, मराठी भाषेतील अशा दैनिक वृत्तपत्राच्या एका अंकात आणि अशा अन्य प्रादेशिक भाषेतील अशा दैनिक वृत्तपत्राच्या एका अंकात जाहिरात देऊन देण्यात येईल; आणि अशा प्रत्येक नोटीशीद्वारे, जाहिरातीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत आयुक्ताकडे मागणीहक्काचा पुरावा दाखल करण्यास मागणीदाराला सांगण्यात येईल.

(३) आयुक्ताने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये आपल्या मागणीहक्काचा पुरावा दाखल करण्यात कसूर करणाऱ्या प्रत्येक मागणीदारास आयुक्ताकडून होणाऱ्या संवितरणातून वगळण्यात येईल.

(४) आयुक्त, त्याच्या मते आवश्यक असेल असे अन्वेषण केल्यानंतर, आणि मालकांना हक्कमागण्यांसंबंधी खंडन करण्याची संधी दिल्यानंतर आणि मागणीदारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी आदेशाद्वारे हक्कमागणी पूर्णत: किंवा अंशत: स्वीकृत करील किंवा तो फेटाळून लावील.

(५) आयुक्ताला त्याची कामे पार पाडताना उद्‌भवणाऱ्या सर्व बाबींसंबंधी स्वत:ची कार्यपद्धती निश्चित करण्याचा अधिकार राहील—यामध्ये, त्याने त्याच्या कामकाजाची जागा/कामकाजाच्या जागा ठरवण्याचाही समावेश असेल—आणि या अधिनियमाखाली अन्वेषण करण्याच्या प्रयोजनासाठी त्याला 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' खाली दिवाणी न्यायालयामध्ये, पुढील बाबींसंबंधातील खटला चालवताना निहित असणाऱ्या अधिकारांसारखेच, अधिकार असतील, ते असे :— १९०८ चा ५.

(अ) कोणत्याही साक्षीदारास बोलावणे व हजर राहण्यास भाग पाडणे व त्याची शपथेवर साक्षतपासणी करणे;

(ब) पुरावा म्हणून सादर करण्याजोगा कोणताही दस्तऐवज किंवा इतर मूर्त वस्तू प्रकट करवणे व सादर करणे;

(क) प्रतिज्ञालेखांवर पुरावा स्वीकारणे ;

(ड) साक्षीदारांच्या तपासणीकरिता कोणतेही आयोगपत्र काढणे.

(६) आयुक्तापुढील कोणतीही अन्वेषण कार्यवाही ही 'भारतीय दंड संहिता, १८६०' याच्या कलम १९३ व २२८ च्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही मानण्यात येईल आणि 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३', कलम १९५ आणि प्रकरण सव्वीस याच्या प्रयोजनार्थ आयुक्त हा दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५. १९७४ चा २.

(७) आयुक्ताच्या निर्णयामुळे समाधान न होणाऱ्या मागणीदारास अशा निर्णयाविरुद्ध अपील करता येईल व हे अपील, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीमध्ये मालकाचे नोंदणीकृत कार्यालय असेल अशा, मूळ अधिकारितेच्या मुख्य दिवाणी न्यायालयाकडे करावे लागेल :

परंतु, उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असणारी व्यक्ती ही आयुक्त म्हणून नेमण्यात येईल त्या बाबतीत, असे अपील, मुंबई उच्च न्यायालयाकडे करण्यात येईल आणि अशा अपीलाची सुनावणी व निर्णय त्या उच्च न्यायालयाच्या किमान दोन न्यायाधीशांकडून करण्यात येईल.

२१. या अधिनियमान्वये एखादी हक्कमागणी स्वीकृत केल्यानंतर, अशा हक्कमागणीबाबत देय असणारी रक्कम आयुक्त हा, ज्यांना अशी रक्कम देय असेल त्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना देईल आणि अशा प्रदानानंतर, अशा हक्कमागणीबाबतचे मालकांचे दायित्व पूर्णपणे फिटेल.

आयुक्ताकडून मागणीदारांना होणारे पैशाचे संवितरण.

२२. (१) उपक्रमाच्या संबंधात आपणांकडे देण्यात आलेल्या पैशातून, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली दायित्वे भागवल्यानंतर कोणतीही शिल्लक राहिली तर आयुक्त ती शिल्लक रक्कम मालकांना देईल.

मालकांना रकमांचे संवितरण.

(२) जेव्हा या अधिनियमान्वये कोणतीही यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा अन्य मालमत्ता राज्य शासनाच्या महामंडळाच्या किंवा एखाद्या नवीन शासकीय कंपनीच्या ताब्यात आली असेल, परंतु ती यंत्रसामग्री, साधनसामग्री किंवा अन्य मालमत्ता उपक्रमाच्या मालकांच्या मालकीची नसेल तेव्हा राज्य शासनाने किंवा महामंडळाने किंवा अशा शासकीय कंपनीने अशी यंत्रसामग्री किंवा साधनसामग्री किंवा अन्य मालमत्ता नियत दिवसाच्या लगतपूर्वी ज्या अटींवर व शर्तींवर ती मालकांच्या ताब्यात होती त्याच अटींवर व शर्तींवर पुढेही ताब्यात ठेवणे कायदेशीर असेल.

२३. आयुक्तास दिलेल्या रकमेपैकी जेवढी रक्कम आयुक्तांचे कार्यालय अंतिम रीत्या समापित होण्याच्या तारखेच्या निकटपूर्वीच्या तारखेस, असंवितरित किंवा विनामागणी शिल्लक राहील अशी कोणतीही रक्कम आयुक्त, त्याचे कार्यालय अंतिम रीत्या समापित होण्यापूर्वी, राज्य शासनाच्या सर्वसाधारण महसुली खात्याकडे बदली करील, परंतु अशा बदली केलेल्या रकमेसंबंधी कोणतीही मागणी राज्य शासनाकडे, अशा पैशांना हक्कदार असणाऱ्या व्यक्तींकडून केली जाऊ शकेल व ह्या हक्कमागणीवरील कार्यवाही, जणू काही ती रक्कम बदली झालेली नाही व हक्कमागणीच्या प्रदानासाठी काढावयाचा कोणताही आदेश हा महसुलांच्या परताव्याचा आदेश आहे असे मानून करण्यात येईल.

असंवितरित किंवा मागणी न केलेली रक्कम सर्वसाधारण महसूल खात्यावर जमा करणे.

## प्रकरण सात

### संकीर्ण

२४. या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या काळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कायद्याच्या आधारे परिणामक्षम असणाऱ्या इतर कोणत्याही लेखात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या अथवा इतर प्राधिकरणाच्या कोणत्याही हुकूमनाम्यात किंवा आदेशात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, परिणामक्षम असतील.

अधिनियमाचा अधिभावी परिणाम होणे.

२५. कलम ३ अन्वये राज्य शासनाकडे निहित झालेल्या आपल्या उपक्रमाच्या संबंधात कोणत्याही सेवेसाठी, विक्रीसाठी किंवा पुरवठ्यासाठी मालकांनी केलेली व नियत दिवसाच्या निकटपूर्वी अमलात असलेली प्रत्येक संविदा, नियत दिवसापासून एकशेऐंशी दिवस संपल्याच्या दिवशी व तेव्हापासून परिणामक्षम असण्याचे बंद होईल. अशा या अधिनियमान्वये ज्याकडे असा उपक्रम निहित करण्यात आला आहे अशा राज्य शासनाने किंवा महामंडळाने किंवा अशा नवीन शासकीय कंपनीने तो कालावधी संपण्यापूर्वी अशा संविदेला लेखी अनुसंमती दिलेली असेल तर ती चालू राहील आणि अशी संविदा अनुसंमत करताना त्यात राज्य शासन किंवा महामंडळ किंवा अशी शासकीय कंपनी स्वत:ला योग्य वाटेल असा बदल किंवा फेरबदल करू शकेल :

परंतु राज्य शासन किंवा महामंडळ किंवा अशी शासकीय कंपनी,—

(अ) अशी संविदा ही अत्यंत भारयुक्त अशी आहे किंवा दुर्भावनेने केलेली आहे किंवा राज्य शासनाच्या किंवा महामंडळाच्या किंवा अशा शासकीय कंपनीच्या हितसंबंधांना ती मारक आहे अशी स्वत:ची खात्री झालेली असेल तर तेवढी बाब वगळून; आणि

राज्य शासनाने किंवा महामंडळाने किंवा नवीन शासकीय कंपनीने अनुसंमत न केल्यास संविदा परिणामक्षम असण्याचे बंद होणे.

(ब) संविदेच्या पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय आणि संविदा अनुसंमत करण्यास नकार देण्याची आपली कारणे किंवा संविदेत कोणताही बदल किंवा फेरबदल करण्याची कारणे नमूद केल्याशिवाय

संविदेला अनुसंमती नाकारणार नाही किंवा संविदेमध्ये कोणताही बदल किंवा फेरबदल करणार नाही.

सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण. २६. (१) या अधिनियमान्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही कृतीबद्दल राज्य शासन किंवा महामंडळ किंवा नवीन शासकीय कंपनी किंवा त्या शासनाचा, महामंडळाचा किंवा तशा शासकीय कंपनीचा कोणताही अधिकारी किंवा अन्य कर्मचारी किंवा राज्य शासनाने, महामंडळाने अथवा तशा शासकीय कंपनीने प्राधिकृत केलेली अन्य व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

(२) या अधिनियमान्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही कृतीमुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही नुकसानाबद्दल राज्य शासन किंवा महामंडळ किंवा नवीन शासकीय कंपनी किंवा त्या शासनाचा, महामंडळाचा किंवा तशा शासकीय कंपनीचा कोणताही अधिकारी किंवा अन्य कर्मचारी किंवा राज्य शासनाने, महामंडळाने अथवा तशा शासकीय कंपनीने प्राधिकृत केलेली अन्य व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

अधिकार सोपवणे. २७. (१) राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असा निदेश देऊ शकेल की, या कलमाद्वारे किंवा कलम ३० व कलम ३१ द्वारे प्रदान केलेले अधिकार वगळता, या अधिनियमान्वये त्याने वापरण्याजोगे सर्व किंवा कोणतेही अधिकार, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्तीदेखील वापरू शकेल किंवा वापरू शकतील.

(२) पोटकलम (१) अन्वये कोणताही अधिकार सोपवण्यात येईल तेव्हा, जिच्याकडे असा अधिकार सोपवण्यात आला असेल ती व्यक्ती राज्य शासनाच्या निदेशनाखाली, नियंत्रणाखाली व पर्यवेक्षणाखाली काम करील.

शिक्षा. २८. जी कोणतीही व्यक्ती,—

(अ) उपक्रमाचा भाग असणाऱ्या कोणत्याही मालमत्तेचा कब्जा, अभिरक्षा किंवा नियंत्रण तिच्याकडे असताना अशी मालमत्ता, राज्य शासनास किंवा महामंडळास किंवा नवीन शासकीय कंपनीस न देता गैरपणे अटकावून ठेवील ; किंवा

(ब) उपक्रमाचा भाग असणाऱ्या कोणत्याही मालमत्तेचा कब्जा गैरपणे मिळवील किंवा ती ठेवून घेईल; किंवा

(क) तिच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा नियंत्रणाखाली असेल असा उपक्रमाच्यासंबंधीचा कोणताही दस्तऐवज बुद्धिपुरस्सर रोखून ठेवील किंवा तो प्रकरणपरत्वे, राज्य शासनाकडे किंवा महामंडळाकडे किंवा नवीन शासकीय कंपनीकडे किंवा त्या शासनाने, त्या महामंडळाने किंवा त्या शासकीय कंपनीने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे किंवा व्यक्तिनिकायाकडे सादर करण्यात कसूर करील ; किंवा

(ड) तिच्या कब्जातील, अभिरक्षेतील किंवा नियंत्रणाखालील उपक्रमविषयक कोणतीही मत्ता, लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा इतर दस्तऐवज प्रकरणपरत्वे राज्य शासनाकडे, महामंडळाकडे किंवा नवीन शासकीय कंपनीकडे अथवा त्या शासनाने, महामंडळाने किंवा तशा शासकीय कंपनीने विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीकडे किंवा व्यक्तिनिकायाकडे सुपूर्द करण्यात कसूर करील ; किंवा

(ई) उपक्रमाचा भाग असणारी कोणतीही मालमत्ता गैरपणे हलवील किंवा नष्ट करील; किंवा

(फ) जी खोटी असल्याचे किंवा अत्यंत चुकीचा असल्याचे तिला माहीत असेल किंवा तसे समजण्यास तिला वाजवी कारण असेल अशी कोणतीही हक्कमागणी या अधिनियमान्वये गैरपणे सादर करील,

तिला, दोषसिद्धीअन्ती दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कैदेची किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

२९. (१) या अधिनियमाखालील एखादा अपराध कंपनीने केलेला असेल त्या बाबतीत, अपराध घडला त्यावेळी कंपनीचा धंदा चालविण्याबद्दल जी जी व्यक्ती कंपनीची हुकूमतदार होती आणि कंपनीला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनीही अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि ती त्याबद्दल कार्यवाही केली जाण्यास आणि तद्नुसार शिक्षा होण्यास पात्र असेल : कंपन्यांनी केलेले अपराध.

परंतु, जर कोणतीही अशी व्यक्ती, अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध करील तर, ती या पोट कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही शिक्षा होण्यास पात्र ठरणार नाही.

(२) पोट कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील कोणताही अपराध जेव्हा कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने करण्यात आला असेल, किंवा त्याने केलेल्या हलगर्जीपणाशी त्यांचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा असेल तेव्हा, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी हा, त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा होण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(अ) "कंपनी" म्हणजे कोणताही निगम निकाय होय आणि त्यात, भागीदारी संस्था किंवा अन्य व्यक्ति संघ यांचा समावेश होतो ; आणि

(ब) "संचालक" म्हणजे भागीदारी संस्थेच्या संबंधात, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार होय.

३०. (१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या उपबंधाच्या अंमलबजावणीकरिता **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषतः आणि पूर्ववर्ती अधिकाराच्या व्यापकतेस बाध न येता अशा नियमांत पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(अ) कलम ४, पोट कलम (३) मध्ये निर्देश केलेली सूचना आयुक्तास किती मुदतीत व कशारीतीने द्यावयाची;

(ब) कलम १३ खालील कोणत्याही भविष्य निर्वाहनिधीत किंवा अन्य निधीत असलेल्या पैशाची व्यवस्था कशा रीतीने लावावयाची ;

(क) विहित करण्याची आवश्यकता असेल किंवा करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) ह्या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एका अधिवेशनाने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती अधिवेशने मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले व त्यांनी असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केला तर, अशा तदनंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच अमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे तत्पूर्वी त्या नियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार. **३१.** या अधिनियमाच्या तरतुदी अमलात आणताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल असा आदेश काढून ती दूर करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

सन १९८४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ याचे निरसन व व्यावृत्ती. **३२.** (१) 'शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स (उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण) अध्यादेश, १९८४' हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन करण्यात आलेले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई, तसेच केलेले कोणतेही नियम, किंवा काढण्यात आलेला कोणताही आदेश किंवा निदेश हा या अधिनियमाच्या तत्सम उपबंधांन्वये, करण्यात आल्याचे किंवा प्रकरण परत्वे काढण्यात आल्याचे समजण्यात येईल. १९८४चा महा. अध्या. ५.

## अनुसूची

[पहा कलमे २(ग), १७, १८, १९, २०(१) व २२]

**व्यवस्थापन हाती घेण्यापूर्वीच्या कालावधीबद्दलची मालकांची, दायित्वे फेडण्यासंबंधातील प्राथम्यक्रम.**

**प्रवर्ग एक.—**

(अ) उपक्रमातील मालकांच्या कर्मचाऱ्यांची मजुरी, वेतन व त्यांना देय असलेल्या इतर रकमा.

(ब) भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या संबंधातील विम्याचा हप्ता यासाठी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी कर्मचाऱ्यांचे वेतन व मजुरी यातून केल्या जाणाऱ्या वजाती.

(क) (उपदान वगळता) भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा निधी, आयुर्विमा महामंडळाच्या विम्याचा हप्ता यांमध्ये मालकांनी द्यावयाच्या अंशदानांसंबंधातील थकबाकी आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याखालील अन्य कोणतीही थकबाकी.

**प्रवर्ग दोन.—**

पुढील संस्थांनी दिलेल्या प्रतिभूत कर्जांच्या मुद्दलाची रक्कम—

(अ) केंद्र शासन;

(ब) राज्य शासन;

(क) बँका आणि सार्वजनिक वित्तीय संस्था;

(ड) अन्य कोणत्याही यंत्रणा.

**प्रवर्ग तीन.—**

(अ) कोणतेही व्यापारविषयक किंवा निर्मितीविषयक व्यवहार करण्यासाठी मालकांनी घेतलेली कोणतीही पतकर्जे.

(ब) माल किंवा सेवा पुरविल्याबद्दल राज्य वीज मंडळास किंवा शासकीय व निमशासकीय संस्थांना देय असलेल्या कोणत्याही रकमा.

(क) कर्जे व अग्रिमे यांवरील व्याजाची थकबाकी.

(ड) केंद्र शासन, राज्य शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण यांना देय असलेला महसूल, कर, पट्टा किंवा अन्य देय रकमा.

(इ) अन्य कोणतीही कर्जे किंवा देय रकमा.

(यथार्थ अनुवाद)

**न. ब. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.